
प्रतिभेच्या
प्रांतातील
प्रवास
अशोक
निरफराके

# प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास

(ललित लेखनाची कृतिपुस्तिका)

लेखक

**अशोक निरफराके**

**शैक्षणिक उपक्रम संशोधिका–प्रकाशन तिसरे**

**ज्ञान प्रबोधिनी**

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

**प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास**
(ललित लेखनाची कृतिपुस्तिका)

**प्रकाशक :**
वि.शं.देशपांडे,
कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ४११०३०

**मुद्रक :**
संपादक, छात्र प्रबोधन, पुणे ४११०३०

**लेखक :**
अशोक निरफराके,
'भवानीकृपा', २६० सहकारनगर क्र.१, पुणे ४११००९

**अक्षरजुळणी :**
छात्र प्रबोधन, ५१०,सदाशिव पेठ, पुणे

**मुखपृष्ठ चित्रकार :**
गिरीश सहस्रबुद्धे

© **सर्व हक्क प्रकाशकाधीन**

**प्रथम आवृत्ती** : राष्टीय सौर श्रावण, शके १९१७, ऑगस्ट १९९५/२००० प्रती
**पुनर्मुद्रण-१** : राष्टीय सौर मार्गशीर्ष, शके १९२१,डिसेंबर १९९९/२००० प्रती
**द्वितीय आवृत्ती** : राष्टीय सौर मार्गशीर्ष, शके १९२९, डिसेंबर २००७/२००० प्रती

**किंमत रु. ५०/-**

Pratibhechya Prantateel Pravas
(A workbook of Literary Creativity)
by Dr.Ashok Nirpharake, in Marathi

# अनुक्रमणिका


✻ प्रस्तावना ....७

✻ प्रवासाला निघण्यापूर्वी ....९

*भाग १ : शब्दांशी दोस्ती...* ...११ ते २२

१) अनुप्रास असलेले वा य लिहिणे
२) एका कान्याचा फरक
३) फ त अनुस्वारामुळे
४) उलटसुलट शब्द
५) आद्याक्षरांचा गोंधळ
६) नवे नादानुकारी शब्द
७) त्रि-कूट
८) शब्दांची उत्क्रांती
९) शाब्दिक कोट्या
१०) श्लेष

*भाग २ : रचनेची खटपट ...* ...२३ ते ७२

**१. गाणी, कविता वगैरे...** ...२३

१) चिडवाचिडवी
२) यमक-गाणी
३) घोषणा किंवा जाहिरातीची गाणी
४) नावे लपविलेल्या कविता
५) गुप्त-संदेश-कविता
६) वृत्तांमधल्या ओळी रचणे
७) विडंबन-कविता
८) समस्यापूर्ती
९) दिलेल्या विषयावर कविता रचणे
१०) भाव-कविता लिहिणे

**२. गोष्ट लिहून पाहा** ...४६

१) कल्पना-प्रधान गोष्ट

२) निसर्गातल्या घटनांचे गोष्टीतून स्पष्टीकरण

३) अद्‌भुत-कथा

४) विज्ञान-कथा

५) गोष्ट लिहिण्याची आणखी एक यु ती

**३. संवाद-लेखन** ...५७

**४. विनोद-निर्मिती** ...५९

१) विसंगती

२) अतिसंगती

३) कलाटणी

**५. वर्णनातली सूचकता** ...६९

१) उपमा देणे

२) प्रतिमांचा वापर

३) प्रतीके

४) रूपक-कथा

*भाग ३ : रचण्याकडून सुचण्याकडे...* ...७३ ते ८०

**१. लिहिण्याची इच्छा** ...७३

**२. संवेदनशीलता** ...७५

१) ज्ञानेंद्रियांच्या वापरातली

२) भावनांबद्दलची

३) माणसांबद्दलची

* पुढच्या प्रवासासाठी शुभेच्छा ! ...८१

* शिक्षकांसाठी ...८५

* परिशिष्ट - प्रतिभा आणि कल्पकता ...८९

# प्रस्तावना

आपल्याकडच्या शालेय अभ्यासक्रमात चित्रकलेला स्थान आहे, संगीताला आहे, हस्तकलांना आहे; पण ललित-लेखन-कलेला मात्र नाही ! ते का नसावे? या अस्वस्थतेतून हे पुस्तक लिहिले गेले आहे.

आपल्याला लिहिता येते हा शोध माझ्या शालेय जीवनात मला अपघातानेच लागला; पण त्यावेळी या क्षमतेच्या विकासाची शालेय जीवनात काहीच सोय नव्हती. हस्तलिखिते, नियतकालिके, निबंधस्पर्धा आणि स्नेहसंमेलनात बसवायचे कार्यक्रम यातून जो काही वाव मिळेल तेवढाच. अजूनही बहुतेक सर्व शाळांतून थोड्या फार फरकाने हीच परिस्थिती आहे. प्रतिभा ही उपजत असते आणि तिचा विकास ज्याने त्याने आपला आपण चुकतमाकत करायचा असतो, ही गैरसमजूत या परिस्थितीच्या मुळाशी आहे.

आधुनिक मानसशास्त्राने ही गैरसमजूत खोटी ठरवली आहे. प्रतिभेचा गाभा असलेली कल्पनाश ती प्रत्येकालाच लाभलेली असते आणि प्रशिक्षणाने तिचा विकास होऊ शकतो; उलट तिच्या मार्गात चाकोरीची स ती, अपयशाची भीती किंवा टिंगलटवाळी आणि उपेक्षा असे अडथळे उभे केले तर ती कोळपून जाते, हे आता संशोधनाने सिद्ध झाले आहे. मी स्वत:सुद्धा गेली २५-३० वर्षे याच क्षेत्रात संशोधन आणि प्रयोग करतो आहे. (त्या संशोधनाचा तपशील या पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात पाहायला मिळेल.) त्या संशोधनावर हे पुस्तक आधारलेले आहे.

या पुस्तकाची ललित-लेखन-कलेच्या टप्प्यांनुसार तीन विभागांत विभागणी केली आहे. पहिले दोन भाग अभिव्य ती-कौशल्याबद्दलचे आहेत. त्यातला पहिला शब्दप्रभुत्व मिळविण्याबद्दलचा, तर दुसरा रचना-प्रभुत्व मिळविण्याबद्दलचा आहे. तिसरा भाग आशयाबद्दलचा, आशय संपन्न होण्यासाठी, अभिनव असण्यासाठी अनुभव-क्षमता वाढविण्याबद्दलचा आहे. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी हे पुस्तक आपणहून कृतिपुस्तिकेप्रमाणे वापरू शकतील अशा रीतीने ते लिहिलेले आहे. शेवटचे प्रकरण शिक्षकांसाठी आहे. ते वाचणाऱ्या शिक्षकांना, जागरूक पालकांना किंवा शालेय विद्यार्थ्यांसाठी व्य तिमत्त्व-विकास वर्ग योजणाऱ्या विविध संस्थांच्या कार्यकर्त्यांना आपापल्या विद्यार्थ्यांसाठी अथवा पाल्यांसाठी या पुस्तकातले सर्जनशीलता वाढवणारे पाठ सहज घेऊन पाहता येतील. किंबहुना, ललित लेखन नव्यानेच करू इच्छिणाऱ्या कोणत्याही वयाच्या व्य तीला हे पुस्तक उपयोगी पडू शकेल.

गेल्या पिढीमध्ये कै.ना.सी.फडके यांनी शिकाऊ लेखकांना मार्गदर्शन करण्यासाठी 'प्रतिभा-साधन' हे पुस्तक लिहिले होते. विविध कारणांनी ते वादग्रस्तही झाले होते; पण ते पुस्तक आणि हे पुस्तक यांची भूमिका, मांडणी आणि मानसशास्त्रीय संशोधनाचा आधार यांमध्ये खूपच तफावत आहे हे दोन्ही पुस्तके वाचणाऱ्यांच्या सहज लक्षात येईल. त्यामुळे वाचकांकडून तशी गल्लत केली जाऊ नये अशी अपेक्षा आहे.

या पुस्तकातला काही भाग 'छात्र प्रबोधन' या ज्ञान प्रबोधिनीच्या मासिकातून प्रसिद्ध झाला आहे. शिक्षकांसाठीच्या प्रकरणातला काही भाग 'शिक्षणसमीक्षा' या द्वैमासिकात प्रसिद्ध झाला आहे. 'प्रतिभा आणि कल्पकता' हे परिशिष्ट 'कल्पक बनू या' या माझ्या पुस्तकातून घेतले आहे. प्रतिभेविषयीच्या सैद्धान्तिक मांडणीला पूरक ठरावे या हेतूने ते पुनर्मुद्रित केले आहे. दोन्ही पुस्तकांना जोडणाऱ्या सेतूचे काम हे परिशिष्ट करील.

'छात्र प्रबोधन'च्या संपादकांच्या आग्रहामुळेच हे पुस्तक लिहून झाले. या पुस्तकात जागोजागी दिलेली 'ज्ञान प्रबोधिनी' प्रशालेतील मुलामुलींच्या लेखनाची उदाहरणे, प्रज्ञा मानस संशोधिकेमधील सगळ्यांच्या प्रेमळ आजी श्रीमती कमलाताई भट यांनी मुलामुलींच्या वह्यांमधून वेळच्या वेळी चिकाटीने टिपून ठेवल्यामुळेच उपलब्ध होऊ शकली. या संशोधनातल्या प्रयोगांसाठी ज्ञान प्रबोधिनीतले संबंधित कार्यकर्ते आणि शिक्षक यांचे सहकार्य लाभले आणि येथील विद्यार्थ्यांचा, तसेच इतर अनेक संस्थांमधल्या विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा उत्साही प्रतिसाद लाभला. (त्या इतर संस्थांची नावे शेवटच्या प्रकरणात आलेलीच आहेत.) या पुस्तकाची मुद्रणप्रत सिद्ध करण्यासाठी कु. श्रद्धा तीर्थळी हिची खूप मदत झाली. या सगळ्यांना मन:पूर्वक धन्यवाद !

हे पुस्तक नुसते सलग वाचून संपवायचे नसून वापरून पाहायचे आहे. त्यामुळे ते वापरल्यानंतरच्या, विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या प्रतिक्रिया आणि सूचना यांची प्रतीक्षा आहे.

ऑगस्ट १९९५ — अशोक निरफराके

## ज्ञान प्रबोधिनीची शैक्षणिक प्रकाशने

**१.व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत** रु.६०/-
(सर्वांगीण व्य तिमत्त्व विकासासाठी समग्र मांडणी)

**२.नावीन्यपूर्ण प्रकल्प कसे करावेत ?** रु.५०/-
(प्रकल्पासंबंधी अनुभवातून लिहिलेले पुस्तक)

**३.प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास** रु.५०/-
(ललित लेखन कसे करावे ? याचा मूलमंत्र देणारे पुस्तक)

**४.कल्पक बनू या** रु.६०/-
(कल्पनाश ती वाढविण्याची गुरुकि ी सांगणारे पुस्तक)

**५.असे घटते सुंदर अक्षर** रु.१०/-
(हस्ताक्षर सुधारण्यासाठी कृतिपुस्तिका)

**६.हसत खेळत बुद्धिविकास** रु.१००/-
(बुद्धीच्या विविध पैलूंसाठी विविध खेळ)

**७. छंद आकाशदर्शनाचा** रु.६०/-
(आकाशातील नक्षत्रे-ताऱ्यांचा परिचय)

**८.प्रज्ञाबोध मालिका-५ पुस्तकांचा संच रु.२२५/-**
(राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेसाठी उपयुक्त-दोन्ही माध्यमांमध्ये)

**९.वेध यशाचा** रु.७०/-
(स्वत:चा अभ्यास स्वत: करण्यासाठी उपयु त तंत्रे)

**१०. बुद्धिवैभव** रु.२०/-
(बुद्धीचे १२० पैलू उलगडून सांगणारे पुस्तक)

**११.गिर्यारोहणगाथा** रु.४०/-
(गिर्यारोहणाची प्राथमिक माहिती व प्रेरणा देणारे पुस्तक)

**१२. प्रबोधन गीते-भाग : २ ध्वनिफीत** रु.४०/-
( ज्ञान प्रबोधिनीतील स्फूर्तिगीते )

### इतरही अनेक पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर

### नियतकालिके

**१.छात्र प्रबोधन** वार्षिक वर्गणी: रु. १५०/-
( कुमारांसाठी अभिनव मासिक )

**२.प्रशिक्षक** वार्षिक वर्गणी: रु. ६०/-
(शिक्षकांसाठी द्वैमासिक)

---

**✻ संपर्क पत्ता:**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०. ☎ (०२०) ४४७८०९५, ४४७७६९१
फॅ स-४४९१८०६ **E-mail:** prabodhini@vsnl.com

आपल्याकडे शालेय अभ्यासक्रमात
चित्रकलेला स्थान आहे, संगीताला आहे, हस्तकलांना आहे;
पण ललितलेखन कलेला मात्र नाही !
ते का नसावे?
या अस्वस्थतेतून लिहिले गेलेले पुस्तक !

प्रतिभा उपजत असते आणि तिचा विकास
ज्याने त्याने आपला आपण चुकत माकत करायचा असतो,
ही गैरसमजूत आधुनिक मानसशास्त्राने खोटी ठरविली आहे.
प्रत्येकामध्येच प्रतिभेचे बीज असते.
पद्धतशीरपणे प्रयत्न करून त्या बीजाचा विकास करता येतो.
स्वत: लेखकाने २०-२५ वर्षे याच क्षेत्रात केलेल्या
संशोधन आणि प्रयोगांवर आधारलेले पुस्तक !

शब्दांशी दोस्ती करत,
कविता, गाणी, गोष्टी, संवाद, विनोद अशा
साहित्यप्रकारांचे लेखन करण्याचे
तंत्र अन् मंत्र सोदाहरण स्पष्ट करणारे पुस्तक !

शालेय विद्यार्थी, किंबहुना ललित लेखन करू इच्छिणाऱ्या
कोणत्याही वयातील व्यक्तीला कृतिपुस्तिकेप्रमाणे
एकलव्याच्या पद्धतीने वापरता येईल असे पुस्तक !

तुमच्यातल्या सुप्त प्रतिभेला
चांगली जागी करून कामाला लावण्यासाठी
लिहिलेले प्रतिभेच्या प्रांतातील अभिनव पुस्तक !